R.No. MHAMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ९६

दि.२७ मार्च २०२६,वार: शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## बॅडमिंटन स्पर्धेत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वर्चस्व

### विश्वमैदान २०२६ : साई कृष्णा व नेहाल शहा चमकले; जीएमसी व एमआयडीएसआर यांच्यात अंतिम लढत

लातूर,–माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने आयोजित 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवात पहिल्याच दिवशी रंगलेल्या बॅडमिंटन स्पर्धेत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने (व्हीडीजीएमसी) दमदार कामगिरी करत उपांत्य फेरीपर्यंत आपले वर्चस्व सिद्ध केले. साई कृष्णा आणि नेहाल शाह यांच्या उल्लेखनीय खेळाच्या जोरावर जीएमसी संघाने विविध गटांत विजयांची मालिका कायम ठेवली.

दुसरीकडे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाने (एमआयडीएसआर) देखील गजानन वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली प्रभावी खेळ सादर करत अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. त्यामुळे आता जीएमसी आणि एमआयडीएसआर यांच्यात अंतिम लढत रंगणार आहे.

स्पर्धेच्या प्रारंभी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी आणि एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्पर्धा संयोजिका डॉ. वर्षा सांगळे, सहसंयोजक डॉ. सुजित झाडके, डॉ. गोपाळ नागरगोजे, क्रीडा शिक्षक बालासाहेब शेप, प्रतिक्षा कसबे यांच्यासह आयोजन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



पहिल्याच दिवसाच्या सामन्यांमध्ये वेग, अचूकता आणि कौशल्याचा उत्कृष्ट संगम पाहायला मिळाला. मुलांच्या एकेरी गटात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या साई कृष्णा यांनी श्री वेताळेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर (एसव्हीएसएस) च्या ऋतेश धवळे तसेच कै. बब्रुवान काळे मांजरा आयुर्वेदिक महाविद्यालय, लातूर (एमबीव्ही काळे) च्या आर्यन कलशेट्टी यांच्यावर मात करत आपली दावेदारी भक्कम केली. त्याच गटात एमआयडीएसआर च्या गजानन वाघमोडे यांनी एमआयपीटी फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर (एमआयपीटी) च्या सारंग देशमुख यांना पराभूत करून लक्ष वेधून घेतले.

मुलींच्या एकेरी गटात देखील चुरशीचे सामने रंगले. एसव्हीएसएस च्या रोहिणी पाचंगे यांनी प्रयाग कराड कॉलेज ऑफ नर्सिंग, नांदगाव (पीकेसीएन) च्या संभोधी कांबळे यांच्यावर विजय मिळवला. तर जीएमसी च्या नेहाल शाह यांनी एमआयडीएसआर च्या साक्षी भिसे आणि एलबीव्ही काळे च्या क्षितिजा यांना पराभूत करत प्रभावी खेळाचे दर्शन घडवले. एमआयपीटी च्या रिया पाटील हिनेही पीकेसीएन च्या संभोधी कांबळे हिच्यावर विजय मिळवत आपली छाप पाडली.

मुलांच्या दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या गजानन वाघमोडे व शशांक सांगळे या जोडीने सलग दोन विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली. तर जीएमसी च्या साई कृष्णा व उत्कर्ष नांदगरे या जोडीनेही सातत्यपूर्ण आणि समन्वयपूर्ण खेळ करत विजयांची नोंद केली.

मुलींच्या दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या सुम्या शास्त्री व अपूर्वा पानसकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजय संपादन केला. त्याचबरोबर जीएमसी च्या नेहाल शाह व प्रणिता जाधव या जोडीने एमआयपीटी आणि वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, लातूर (व्हीकेएचएमसी) संघांवर मात करत आपले वर्चस्व कायम राखले. पीकेसीएन च्या संभोधी कांबळे व दिपाली गरोळे यांनीही एक विजय मिळवत स्पर्धेत आपली उपस्थिती अधोरेखित केली.

मिश्र दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या रोहित ऐतवाडे व सुम्या शास्त्री या जोडीने विजय मिळवून दमदार सुरुवात केली. मात्र या गटातही जीएमसी च्या नेहाल शाह व साई कृष्णा या जोडीने एमआयपीटी आणि एसव्हीएसएस संघांवर सलग विजय मिळवत आपला दबदबा कायम राखला.

पहिल्या दिवसाच्या स्पर्धेत जीएमसी संघाचे सर्व गटांमध्ये वर्चस्व दिसून आले, तर एमआयडीएसआर संघानेही तितकेच कडवे आव्हान उभे केले. त्यामुळे अंतिम सामन्यात या दोन बलाढ्य संघांमध्ये रंगणाऱ्या लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या स्पर्धेसाठी श्री अविनाश अडसुळ, श्री आशिष इंगोले, श्री कृष्णा अडसुळ, ऋषभ करंजकर आणि रमन सय्यद यांनी पंच म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे धावते संचलन श्री परमेश्वर सोनवणे यांनी केले. यावेळी एमआयटी शिक्षण संकुलातील विद्यार्थी, विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील खेळाडू, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## अत्याचार पीडित कुटुंबांना शासकीय नोकरीचा आधार; लातूरमध्ये १७ वारसदारांना नियुक्ती आदेशांचे वितरण

लातूर :- अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत गंभीर गुन्ह्यातील पीडित कुटुंबांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाची लातूर जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली आहे. याअंतर्गत, पात्र ठरलेल्या १७ वारसदारांना बुधवारी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते शासकीय सेवेचे नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले.

यावेळी समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, पोलीस उपाधीक्षक दिलीप सगर यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने २० नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ (सुधारित अधिनियम २०१५) अंतर्गत दाखल खून किंवा अत्याचाराच्या अनुषंगाने मृत्यू झालेल्या प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसास शासकीय किंवा निमशासकीय नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयानुसार, पात्र वारसदारांना 'गट-क' व 'गट-ड' संवर्गातील पदांवर सामावून घेण्याची सविस्तर कार्यपद्धती विहित करण्यात आली असून, या नियुक्तीस अंतिम मंजुरी देण्याचे अधिकार पुणे समाज कल्याण आयुक्तालय, यांना प्रदान करण्यात आले आहेत.

लातूर जिल्ह्यातील प्रकरणांची छाननी करून समाज कल्याण आयुक्तालयाने अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण २३ वारसदारांच्या नियुक्तीस मंजुरी दिली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात १७ पात्र वारसदारांना बुधवारी प्रत्यक्ष नियुक्ती आदेश देऊन त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले. उर्वरित प्रकरणांची प्रक्रियादेखील प्रशासकीय स्तरावर गतीने सुरू आहे.

याप्रसंगी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी सर्व नवनियुक्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच सर्वांचे भारतीय संविधानाची प्रत देवून स्वागत करण्यात आले.

## अचूक जनगणनेसाठी सजग राहून काम करा-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर : ज्याप्रमाणे निवडणुकांचे आयोजन महत्त्वाचे असते, त्याचप्रमाणे जनगणना ही प्रक्रिया देखील देशासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मूल्यमापन करणाऱ्या या प्रक्रियेतूनच देशाच्या विकासाचा खरा रोडमॅप तयार होतो. त्यामुळे जनगणनेच्या कामात सर्वांनी सजग राहून, अचूक नियोजन करावे आणि कोणतीही दिरंगाई करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले.भारताची जनगणना २०२७ अंतर्गत तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांच्या दुसऱ्या टप्प्यातील तीन दिवसीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. या सत्राच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या प्रशिक्षण सत्राला जनगणना संचालनालयाचे सहसंचालक रमेश भोसले, मिलिंद पाटील, लातूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके,



जिल्हा जनगणना समन्वयक विठ्ठल परब यांच्यासह जिल्ह्यातील २३ चार्ज अधिकारी आणि १०६ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ते देशाचे सामाजिक आणि आर्थिक प्रतिबिंब आहे. प्रत्येक घर आणि प्रत्येक कुटुंब जनगणनेत समाविष्ट होईल याची दक्षता घ्यावी. प्रगणकांनी अचूक काम करावे यासाठी त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रगणकांनी लोकांशी संवाद साधताना सकारात्मक राहावे, जेणेकरून जनतेचा प्रत्यक्ष सहभाग वाढेल. सर्व चार्ज अधिकारी आणि प्रशिक्षणार्थींनी आपापसात समन्वय ठेवून हे काम यशस्वी करावे. दहा वर्षांनंतर येणारी ही जनगणनेची प्रक्रिया देशसेवेची एक मोठी संधी आहे. प्रशिक्षणातील सूक्ष्म गोष्टी समजून घ्या आणि कोणतीही समस्या असल्यास त्याचे वेळीच निरसन करून घ्या. या कामात कसलाही हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जनगणना संचालनालयाचे सहसंचालक रमेश भोसले यांनी उपस्थितांना तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणना कायदा, चार्ज अधिकारी यांची वैयक्तिक जबाबदारी, घरांची निवड, इमारतींना क्रमांक देण्याची पद्धत आणि जनगणनेतील विविध टप्प्यांची सविस्तर माहिती दिली.

## संपादकीय...

### चक्रवर्ती सम्राट अशोक महाराज : मानवतेचा दीपस्तंभ

भारतीय इतिहासातील सर्वात महान आणि प्रभावशाली सम्राटांमध्ये चक्रवर्ती सम्राट अशोक महान यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे जीवनकार्य, विचारसरणी आणि मानवतेसाठी दिलेले योगदान यांचा आढावा घेणे म्हणजे आजच्या काळासाठीही प्रेरणादायी ठरते.प्रारंभिक जीवन व साम्राज्य विस्तार.-सम्राट अशोक हे बिंदुसार यांचे पुत्र आणि चंद्रगुप्त मौर्य यांचे नातू होते. मौर्य साम्राज्याचा वारसा त्यांनी पुढे नेला. सुरुवातीच्या काळात अशोक हे पराक्रमी, कठोर आणि महत्त्वाकांक्षी राजा म्हणून ओळखले जात. त्यांनी आपल्या शौर्याच्या बळावर संपूर्ण भारतात आपले साम्राज्य विस्तारले.

कलिंग युद्ध आणि जीवनातील परिवर्तन-अशोकांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे कलिंग युद्ध. या युद्धात लाखो लोकांचा मृत्यू झाला, असंख्य लोक जखमी व बेघर झाले. या भीषण विध्वंसाने अशोकांच्या मनावर खोल परिणाम झाला. युद्धानंतर त्यांनी हिंसा आणि रक्तपाताचा मार्ग सोडून शांतता, करुणा आणि अहिंसेचा मार्ग स्वीकारला.

बौद्ध धर्माचा स्वीकार-कलिंग युद्धानंतर अशोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि गौतम बुद्ध यांच्या शिकवणीचा प्रसार करण्याचे कार्य हाती घेतले. त्यांनी 'धम्म' या संकल्पनेचा प्रचार केला, ज्यात सत्य, अहिंसा, दया, सहिष्णुता आणि नैतिक जीवन यांचा समावेश होता.धम्म प्रचार आणि लोककल्याण-अशोकांनी आपल्या राज्यात आणि राज्याबाहेरही धम्माचा प्रसार केला. त्यांनी स्तंभलेख आणि शिलालेखांच्या माध्यमातून जनतेपर्यंत नैतिक मूल्ये पोहोचवली. श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान इत्यादी देशांमध्ये त्यांनी बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी धम्मदूत पाठवले.त्यांच्या कारकीर्दीत रुग्णालये, विहिरी, रस्ते आणि वृक्षारोपण यांसारखी अनेक लोककल्याणकारी कामे करण्यात आली. प्राणी आणि मानव यांच्यासाठीही त्यांनी करुणेची भावना जोपासली.

आधुनिक काळातील महत्त्व-सम्राट अशोकांचे विचार आजच्या काळातही अत्यंत उपयुक्त आहेत. शांतता, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश देणारे त्यांचे धम्मतत्त्वज्ञान जगासाठी मार्गदर्शक ठरते. भारताच्या राष्ट्रध्वजावरील 'अशोकचक्र' हे त्यांच्या न्याय, धर्म आणि प्रगतीचे प्रतीक आहे.सम्राट अशोक हे केवळ एक महान राजा नव्हते, तर ते एक विचारवंत, समाजसुधारक आणि मानवतेचे उपासक होते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे अनुसरण करून समाजात शांतता, बंधुता आणि समता निर्माण करण्याचा संकल्प केला पाहिजे.अहिंसा, सत्य आणि करुणा यांचा मार्गच खऱ्या अर्थाने मानवतेचा मार्ग आहे हा संदेश देणारे सम्राट अशोक आजही प्रत्येकाच्या मनात जिवंत आहेत.

श्रीलंकेत धम्म प्रचाराचा ऐतिहासिक प्रसंग-सम्राट अशोकांनी कलिंग युद्ध नंतर बौद्ध धम्माचा स्वीकार करून अहिंसा, करुणा आणि मानवतेचा मार्ग स्वीकारला. त्यांनी धम्माचा प्रसार केवळ भारतातच नव्हे तर इतर देशांतही करण्याचा संकल्प केला. यासाठी त्यांनी आपल्या अत्यंत विश्वासू आणि विद्वान पुत्र महेंद्र व कन्या संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले.त्या काळी श्रीलंकेचा राजा देवानामपिय तिस्स होता. महेंद्र यांनी त्याला बौद्ध धम्माची शिकवण दिली. त्यांच्या प्रभावी प्रवचनांमुळे राजा तिस्स व त्याच्या प्रजेला बौद्ध धर्माची दीक्षा घेण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे श्रीलंका हा देश बौद्ध धर्माचा एक प्रमुख केंद्र बनला. संघमित्रा यांनी श्रीलंकेत जाऊन बौद्ध भिक्षुणी संघाची स्थापना केली. त्यांनी बोधी वृक्षाची रोपटी (बोधगया येथील पवित्र बोधीवृक्षाची फांदी) श्रीलंकेत नेली. आजही तो बोधीवृक्ष तेथे अत्यंत श्रद्धेने पूजला जातो आणि तो भारत-श्रीलंका सांस्कृतिक नात्याचे प्रतीक मानला जातो.इतर राजांनी घेतलेला आदर्श-सम्राट अशोकांच्या या कार्याचा प्रभाव केवळ श्रीलंकेपुरता मर्यादित राहिला नाही. त्यांच्या धम्मनीतीचा आदर्श इतर अनेक राजांनीही घेतला.

कनिष्क या कुशाण सम्राटाने बौद्ध धर्माचा स्वीकार करून त्याचा प्रसार मध्य आशिया व चीनपर्यंत केला.हर्षवर्धन यांनीही बौद्ध धर्माला आश्रय देऊन धर्मसभांचे आयोजन केले व समाजात नैतिकतेचा प्रचार केला.श्रीलंका, बर्मा (म्यानमार), थायलंड यांसारख्या देशांतील राजांनी बौद्ध धर्म स्वीकारून आपल्या राज्यकारभारात अहिंसा व धम्माचे तत्त्व अंगीकारले.महेंद्र आणि संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवण्याचा निर्णय हा सम्राट अशोकांच्या दूरदृष्टीचा आणि मानवतावादी विचारसरणीचा उत्कृष्ट नमुना होता. या घटनेमुळे बौद्ध धर्माला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसार मिळाला आणि भारताचा सांस्कृतिक प्रभाव दूरवर पोहोचला. अशोकांच्या या कार्याचा आदर्श पुढील अनेक राजांनी घेतला आणि त्यामुळे धम्माचा प्रकाश संपूर्ण आशियात पसरला.

हा प्रसंग आजही आपल्याला सांगतो की, सत्य, अहिंसा आणि करुणा यांचा संदेश सीमा ओलांडून संपूर्ण मानवजातीला एकत्र आणू शकतो.महान, लोकहितवादी आणि धम्मप्रिय राजाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून बहुजन समाजाने त्यांच्या जयंतीचे उत्सव मोठ्या प्रमाणावर, उत्साहात आणि एकतेच्या भावनेने साजरे करणे अत्यंत आवश्यक आहे. हा उत्सव केवळ परंपरा म्हणून नव्हे, तर समाजप्रबोधन, बंधुभाव आणि धम्माच्या मूल्यांचा प्रसार करण्याचे प्रभावी माध्यम म्हणून साजरा व्हावा.

पूर्वीच्या काळात या महान राजाच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणुका काढल्या जात होत्या. ढोल-ताशांच्या गजरात, धम्मध्वजांच्या छायेत, हजारो अनुयायी एकत्र येऊन एकात्मतेचे दर्शन घडवत असत. समाजातील सर्व घटकांचा सहभाग असलेल्या या मिरवणुका केवळ उत्सव नसून, त्या सामाजिक जागृतीचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक होत्या. त्या परंपरेचे स्मरण करून आजच्या पिढीनेही त्याच उत्साहाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने जयंती साजरी करण्याची गरज आहे.म्हणूनच, या महान राजाच्या कार्याचा आदर्श घेत, बहुजन समाजाने एकत्र येऊन भव्य मिरवणुका, व्याख्याने, धम्मपरिषद आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जयंती साजरी करावी. या चक्रवर्ती सम्राट अशोक राजा यांच्या जयंतीनिमित्त समस्त भारतीयांना हार्दिक शुभेच्छा!

# सम्राट अशोक जयंती साजरी होत नसेल तर?. प्रबुद्ध भारत कसा निर्माण होईल ?

देवनामप्रिय प्रियदर्शी सम्राट अशोक जयंती मोठ्या उत्सवात आणि प्रमाणत का साजरी होत नाही. भारतात अनेक महापुरुषाच्या जयंती मोठया उत्साहात साजऱ्या केल्या जातात, पण दि ग्रेट अशोक सम्राटाचा सम्राट म्हणजे चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती उत्साहात साजरी केली जात नाही.तिथीनुसार तारखेनुसार,काल गणना नुसार असे अनेक वाद महापराक्रमी,राजे,महापुरुष आणि संतांच्या बाबतीत उपस्थित केले जातात. त्यामुळे त्यांच्या क्रांतिकारी विचारापासून प्रेरणा घेण्यापासून रोखण्याचा हा खरा मुद्दा असतो. म्हणूनच मी विचारतो सम्राट अशोक जयंती साजरी होत नसेल तर?. प्रबुद्ध भारत कसा निर्माण होईल ?.

माननीय देवदास बानकर संपादक दैनिक मुक्तनायक कोल्हापूर यांनी सम्राट अशोकाच्या काळाचा अभ्यास करून १२ एप्रिल ही तारिक सम्राट अशोक जयंती आहे असे अकरा वर्ष ज्याचे समर्थन केले होते. त्यांनीच आता सम्राट अशोक जयंती (अशोक अष्टमी) चैत्र महिन्याच्या अष्टमी दिनी अर्थात बुद्धाब्द शक वर्षातील येणाऱ्या तारखे प्रमाणे येत्या गुरुवार दिनांक २६ मार्च २०२६ रोजी असणार असे सांगितले आहे.धम्म दायक सम्राट राजा यांचा जयंतीची अशोक अष्टमी नोंद ही सुर्याकालगणनेवर आधरित ग्रगेरीन कॉलेनडर ख्रिस्ती शकातील तारखेप्रमाणे १२ एप्रिल धरण्यात आली होती. बुद्धाब्द शकाप्रमाणे याच दिवशी सम्राट अशोक जयंती अर्थात अशोक अष्टमी साजरी करणे योग्य आहे.कारण अडीच हजार वर्षा बुद्धाब्द शक हे चंद्रकालेगणनेवर मोजले जाते. आजही ती परंपरा कायम आहे.त्यात बदल केलेला नाही आणि बदल करता येत नाही.म्हणूनच ख्रिस्ती तारखेवर न जाता बुद्धाब्द शक नुसार सम्राट अशोक जयंती साजरी झाली पाहिजे.देवदास बानकर सह अनेक अभ्यासकाचे मत आहे.

सम्राट अशोक यांचे विशाल साम्राज्य होते ज्याला अखंड भारत म्हणतात, सम्राट अशोक यांनी बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार केला.तक्षशीला,नालंदा सारखे २३ विश्व विद्यालय स्थापना केली,या विद्यालयामध्ये देश -विदेशातील विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी येतं असत. सम्राट अशोकचा कालखंड हा सुवर्ण कालखंड गणला जातो. भारतीय राष्ट्र ध्वजावर सम्राट अशोकाचे राजचिन्ह अशोक चक्र अंकित आहे. भारतात सम्राट अशोक पूर्वी व नंतर सम्राट अशोक सारखा सम्राट झाला नाही. तरीही या देशात सम्राट अशोकाची जयंती किंवा त्यांच्या नावाचा प्रचार-प्रसार होत नाही,यावर्षी पासून सम्राट अशोक जयंती साजरी करण्याचा संकल्प अनेक संस्था,संघटना मंडळ पुढाकार घेणार आहेत. कारण सम्राट अशोक जयंती साजरी होत नसेल तर?. प्रबुद्ध भारत कसा निर्माण होईल ?.

सम्राट अशोक जयंती हा एक सण व उत्सव आहे जो चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. त्यांचा जन्म इसवी सन पूर्व ३०४ बिहार व निर्वाण (निधन) इसवी सन पूर्व २३२ मध्ये झालेले आहे.हा सण मोठ्या उत्सात साजरा करतात. चक्रवर्ती सम्राट अशोक हे मौर्य घराण्यातील महान व प्रसिद्ध सम्राट होते. त्यांनी अखंड भारतावर इसवी सन पूर्व २७२ ते इसवी सन पूर्व २३२ च्या दरम्यान राज्य केले. यांना महान अशोक किंवा अशोक द ग्रेट असेही संबोधले जाते. हा भारतीय समाजातील सर्वात महत्त्वाचा लोककल्याणकारी राजा ज्याने अर्धा आशिया खंड काबीज केला होता. आपल्या सुमारे ४० वर्षांच्या विस्तृत राज्यकाळात त्यांनी पश्चिमेकडे अफगाणिस्तान व थोडा इराण,पूर्वेकडे आसाम तर दक्षिणेकडे म्हैसूर पर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. अनेकांच्या मतानुसार,सम्राट अशोक हे जगातील सर्वात महान सम्राट होते.




सम्राट अशोकांना भारताच्या इतिहासात ही सर्वात महान व शक्तिशाली सम्राट म्हणून सम्राट अशोकाला स्थान दिले आहे.तरी त्यांच्या महान कार्यांची नोंद घेऊन जयंती उत्सव का साजरा केल्या जात नाही.हाच खरा संशोधनाचा विषय आहे.

प्राचीन भारताच्या परंपरेत चक्रवर्ती सम्राटांची पदवी ज्यांनी जनमानसावर तसेच भारताच्या मोठ्या भूभागावर राज्य केले अशाच महान सम्राटांना दिली जाते. भारताच्या इतिहासात असे अनेक चक्रवर्ती सम्राट होउन गेले ज्यांचे उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये रामायण,महाभारत इत्यादी आहेत प्राचीन चक्रवर्ती सम्राटांच्या पंक्तीतील अशोक हा शेवटचा चक्रवर्ती सम्राट झाला त्यानंतर कोणीही त्या तोडीचा राज्यकर्ता भारतात झाला नाही.म्हणूनच मान्यवर कांशीराम आपल्या कॅडरबेस कार्यकर्त्यांना नेहमी सांगत होते बहुजन समाज पार्टीला सम्राट अशोकाचा भारत निर्माण करायचा आहे. म्हणूनच मी विचारतो सम्राट अशोक जयंती साजरी होत नसेल तर?. प्रबुद्ध भारत कसा निर्माण होईल ?.

अशोकने भारताच्या बहुतांशी भागावर राज्य केले.बसपाला मानणारा बहुसंख्य बहुजन समाज भारताच्या कोण्या कोण्यात बसलेला आहे.उत्तर भारतातील बहुसंख्य ओबीसीनी मुंबईत व नागपुरात धम्मदिक्षा घेतली,ज्यात मौर्य समाजाचे मोठे योगदान आहे,मौर्य समाज हा सम्राट अशोकाच्या रक्ताचा वारसदार आहे असे म्हणतात पण तो मोठ्या संख्येने हिंदुत्व मानसिकतेने पछाडलेला होता आणि आहे. लडाक,जम्मू, काश्मीर मध्ये बसपाचा आमदार,खासदार निवडून येण्या मागे सम्राट अशोकाचा भारत ही विचारधारा होती.पाकीस्थान,अफगाणीस्तान पूर्वे कडे बांग्लादेश ते दक्षिणेकडील केरळ पर्यंत अशोकाच्या साम्राज्याच्या सीमा होत्या.कलिंगाच्या युद्धातील महासंहारा नंतर कलिंग काबीज झाला,जे कोणत्याही मौर्य राज्यकर्त्यास पूर्वी जमले नव्हते.ते सम्राट अशोकाने करून दाखविले.त्याच्या राज्याचे केंद्रस्थान ज्याला आताचे बिहार म्हणजे तेव्हाचा मगध होता,बिहारची राजधानी पाटणा म्हणून ओळखली जाणारी तेव्हाची पाटीलपुत्र ही त्याची राजधानी होती.याचे एतिहासिक पुरावे आज पटना शहरात पाहण्यास मिळतात. कलिंगाच्या युद्धात झालेल्या प्रचंड मनुष्य हानी पाहून सम्राट अशोकाने हिंसेचा त्याग केला व बौद्ध धर्माचा स्वीकार केला व नंतरच्या आयुष्यात त्याने स्वतःला बौध्द धम्मचा प्रचार आणि प्रसार करण्या करिता समर्पित केले अशोकाच्या काळातील अशोकाच्या संदर्भातील अनेक शिलालेख भारताच्या काना कोपऱ्यात सापडतात त्यामुळे अशोकाबाबतची उपलब्ध ऐतिहासिक माहिती भारताच्या प्राचीन काळातल्या कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तीपेक्षा अधिक आहे.

अशोकाने कलिंगचे युद्ध पार पडल्यानंतर जिकलेल्या रणांगणाची व शहरांची पहाणी करायची ठरवले. त्यावेळेस त्याने फक्त सर्वत्र पडलेले प्रेतांचे ढीग,सडण्याचा दुर्गंध,जळलेली शेती,घरे व मालमत्ता पाहिली. ते पाहून अशोकाचे मन उदास झाले व यासाठीच का मी हे युद्ध जिंकले,व हा विजय नाही तर पराजय आहे,असे म्हणून स्वतः ला त्या प्रचंड विनाशाचे कारण मानले.हा पराक्रम आहे की दंगल,व बायका मुले व इतर अबलांचा हत्या कशासाठी व यात कसला प्राक्रम असे स्वतः लाच प्रश्न विचारले. एका राज्याची श्रीमंती वाढवण्यासाठी दुसऱ्या राज्याचे अस्तित्वच हिरावून घ्यायचे? ह्या विनाशकारी युद्धानंतर शांती,अहिंसा, प्रेम,दया ही मूलभूत तत्त्वे असलेला बौद्ध धम्माचा मार्ग अशोकाने अवलंबायचे ठरवले.त्याने स्वतः बौद्ध धर्माचा प्रसारक म्हणूनही काम करायचे ठरवले.यानंतर अशोकाने केलेले कार्य त्याला इतर कोणत्याही महान सम्राटांपेक्षा वेगळे ठरवतात.ज्यात क्रूरकर्मा राज्यकर्त्याचे महान दयाळू सम्राटात रुपांतर झाले अशी कलिंगाचे युद्ध ही इतिहासातील एक अतिशय वेगळी घटना समजली जाते.

बौद्ध धर्माचा जगभर झालेल्या प्रसारास खूप मोठ्या प्रमाणावर अशोकाने केलेले कार्य जबाबदार होते असे बहुतेक इतिहासकार मानतात. तरी उत्तर भारतातील मागासवर्गीय ओबीसी बौद्ध धम्माकडे न जाता स्वतःला जास्तच सवर्ण समजत होते. जेव्हा अन्याय अत्याचार आणि भीषण हत्याकांड झाली तेव्हाच त्यांना आपण कोण आहोत आणि आपले पूर्वज कोण होते यांची आठवण होते.त्यांनी लोकसंख्येच्या बळावर राजकीय परिवर्तन घडविणे अपेक्षित असते.मान्यवर कांशीराम यांनी बौद्धधम्माची दिक्षा जाहीर पणे घेतली असती तर उत्तर भारत सम्राट अशोकाचा भारत झाला असता.त्यांची चूक उत्तर भारतातील ओबीसीनी सुधारली आता मायावतीने कोणाचा आदर्श घ्यावा हे ठरविले पाहिजे.किती दिवस आर एस एस प्रणित भाजपाला धर्मपरिवर्तनाच्या धमक्या देणार?. आणि राजकारण करणार करीत राहणार?.सम्राट अशोकाचा भारत बौद्धमय करण्यासाठी मागासवर्गीय ओबीसी तयार आहे हे देशातील धम्मदिक्षा सोहळ्यावरून दिसत आहे.

इतिहास सांगतो वैशाली (बिहार) येथील अशोक स्तंभ अशोकाच्या ह्या कार्यात त्याला देवीपासून झालेल्या मुलांची मोठी मदत झाली.अशोकाचा मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा ह्यांनी भारताबाहेर श्रीलंकेत जाऊन तेथील राजाला बौद्ध धम्माची शिकवण दिली यामुळे भारतापुरते मर्यादित राहिलेला हा धम्म भारताबाहेर पसरण्यास सुरुवात झाली.असे मानतात की अशोकाने बौद्ध धर्मीयांसाठी हजारो स्तूपांची व विहारांची निर्मिती केली. त्यातील काही स्तूपांचे अवशेष आजही पहावयास मिळतात. यातील मध्यप्रदेशात सांची येथील स्तूप प्रसिद्ध आहे,हा स्तूप अशोकाने बांधला आहे.

मायावतीने असेच बुद्ध सम्राट अशोक,महात्मा ज्योतिबा फुले,राजर्षी शाहू महाराज डॉ.भिमराव बाबासाहेब आंबेडकर यांचा वैचारिक वारसा सांगून ऐतिहासिक वास्तू जिल्हे,विद्यापीठ निर्माण केले.पण धम्मदिक्षा घेतली काय?.सम्राट अशोकाने आपल्या कारकिदीतील पुढील वर्षांमध्ये अहिंसा हे राष्ट्रीय धोरण बनवले,जंगलामध्ये चैनीसाठी होणारी प्राण्यांची शिकारीवर बंदी आणली,प्राण्यांवर होणाऱ्या कोणत्याही प्रकारची हिंसकतेवर ही बंदी आणली तसेच शाकाहाराला प्रोत्साहन देण्यात आले.शिक्षा मिळालेल्या कैद्यांना अशोकाने सहिष्णूपणे वागवले. गुणी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठी अनेक विद्यापीठे तसेच,शेतकऱ्यांसाठी पाण्याचे कालवे बांधले.त्याच्या राज्यात सर्व प्रकारच्या जातीधर्माच्या लोकांना सहिष्णुरीत्या वागवले जाई. तसेच अशोकाने आपले एकेकाळी ज्याच्यांशी युद्धे केली त्यांच्याशीही मैत्रीपूर्ण संबध वाढवले.सम्राट अशोकाने अनेक समाजोपयोगी कार्ये केली.अशोकाने आपल्या कारकीर्दीत राज्यात अनेक रुग्णालये व महामार्गाचे जाळे निर्माण केले,रस्त्याच्या कडेला वृक्षांची लागवड ही अशोकाचीच कल्पना आहे,असे मानतात.

आपण सम्राट असल्याच्या अधिकाराचा फायदा त्याने समाजोपयोगी कार्यासाठी केला. त्यानंतर लोक अशोकाला धम्मअशोक असे म्हणू लागले.अशोकाने धम्माची प्रमुख आचारतत्त्वे विशद केली,अहिंसा,सर्व जाती धर्मांबद्दल सहिष्णुता,वडिलधाऱ्या माणसांना मान देणे,संत,महात्मा,शिक्षकांना योग्य तो मान देणे,दासांना माणुसकीने वागवणे. अशा आचार तत्त्वांना जगात कोणताही समाज नाकारू शकणार नाही. अशोकाच्या इतिहासकारांनुसार त्याने कलिंगाच्या युद्धानंतर कोणतेही प्रमुख युद्ध छेडले नाही परंतु त्याला शेजारी राष्ट्रांशी ग्रीक राज्ये,चोल साम्राज्ययाच्याशी त्याला नेहमी युद्धाची शक्यता वाटत होती.परंतु अशोकाने पूर्वायुष्यातील केलेल्या मोहिमांमुळे व मगधच्या सामर्थ्यामुळे अशोकने बौद्ध धर्म स्वीकारला तरी त्याच्या शेजारी राज्यांनी त्याला छेडण्याचे साहस केले नाही. तसेच बौद्ध धर्म स्वीकारला,अहिंसा हे राष्ट्रीय धोरण बनवले तरी मगधाचे सैनिकी सामर्थ्य अबाध्य ठेवले.अशोकाला ग्रीक जगताची माहिती होती असे कळते.तसेच चंद्रगुप्त मौर्याने केलेल्या ग्रीकांविरुद्धच्या मोहिमांमुळे मौर्य साम्राज्याची कीर्ती ग्रीस,इजिप्तपर्यंत पोहोचली होती असे कळते.मग सम्राट अशोकाचा भारत बौद्धमय होण्यास वेळ का लागतो. राजकीय गणिते मांडत राहिल्यास अशोकाचा भारत बौद्धमय होईल काय?. हे देशभरातील भव्य धम्मदिक्षा सोहळे केवळ ढोंग आहेत असे म्हणल्यास चूक ठरणार नाही. आज देशात लोकशाही मार्गाने सत्ता काबीज करून लोकशाहीचा सरळ खून करण्याचे कारस्थान उघड उघड होत आहे. लोकशाहीची सर्व मूल्य पायदळी तुडवुन ठोकशाही,हुकूमशाही निर्माण होतांना दिसत आहे. सम्राट अशोक ते छत्रपती शिवाजी,संभाजी महाराज यांना ज्या मनूस्मृती संपविले त्याचं पद्धतीने आज लोकशाही संपत आहे.म्हणूनच विचारावेसे वाटते सम्राट अशोकाचा प्रबुद्ध भारत कसा निर्माण होईल.सम्राट अशोकाचे समाजो उपयोगी विचार अंमलात आणले नाही. तर विषमतावादी विचारांचे लोक डोके वर काढून समाजोपयोगी विचार नष्ट केल्या शिवाय राहणार नाहीत.आज तरी भारतात हेच घडताना दिसत आहे. म्हणूनच सम्राट अशोक जयंती निमित्याने त्यांच्या विचार कार्यावर चर्चा संवाद होणे आवश्यक आहे.म्हणूनच मी विचारतो सम्राट अशोक जयंती साजरी होत नसेल तर?. प्रबुद्ध भारत कसा निर्माण होईल ?.सम्राट अशोकाच्या जयंती निमित्याने त्यांच्या क्रांतिकारी विचारांना कार्यांना त्रिवार अभिवादन आणि सर्व प्रिय वाचक,धम्म उपासक उपासिका यांना हार्दिक शुभेच्छा.

**सागर रामभाऊ तायडे भांडुप मुंबई ९९२०४०३८५९.**

# सम्राट अशोक : तलवारीतून धम्माकडे-मानवतेच्या इतिहासातील अद्वितीय प्रवास

भारतीय इतिहासात अनेक राजे झाले. काहींनी साम्राज्ये उभी केली, काहींनी युद्धे जिंकली, तर काहींनी संपत्ती आणि वैभवाची शिखरे गाठली. परंतु इतिहासात असे फार थोडे राजे आहेत ज्यांनी युद्ध जिंकूनही युद्धाचा त्याग केला आणि सत्ता असूनही मानवतेचा मार्ग स्वीकारला. अशाच अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे अशोका, ज्यांना इतिहासात सम्राट अशोक महान म्हणून ओळखले जाते. सम्राट अशोक हे केवळ एक सामर्थ्यशाली राजा नव्हते, तर ते मानवतेचा संदेश देणारे, दयाभाव आणि करुणेचा मार्ग दाखवणारे एक अद्वितीय शासक होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या विचारांचा आणि त्यांच्या धम्मनीतीचा विचार करताना भारतीय समाजाला आजही नवी दिशा मिळू शकते.

अशोक हे बिंदुसार यांचे पुत्र आणि महान सम्राट चन्द्रगुप्त मौर्य यांचे नातू होते. मौर्य साम्राज्य आधीच विशाल होते, परंतु अशोक यांच्या काळात त्याने प्रचंड विस्तार केला. त्यांच्या सामर्थ्यवान लष्कराने भारतातील मोठा भूभाग जिंकला. त्यांच्या राजवटीच्या सुरुवातीला ते एक कठोर, निर्णायक आणि पराक्रमी योद्धा म्हणून ओळखले जात होते. सत्ता मजबूत करण्यासाठी त्यांनी अनेक युद्धे लढली. परंतु त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टप्पा ठरला तो कालिंग युद्ध कलिंग, इतिहास बदलणारा क्षण. कलिंग (आजचे ओडिशा) जिंकण्यासाठी झालेल्या युद्धाने इतिहासाची दिशा बदलली. या युद्धात लाखो लोक मारले गेले, हजारो जखमी झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. रणांगणावर पडलेली प्रेते, विधवा झालेल्या स्त्रिया, अनाथ झालेली मुले या सगळ्या दृश्यांनी सम्राट अशोक यांचे मन हादरून गेले. इतिहासात सांगितले जाते की या युद्धानंतर त्यांनी रणांगणावर उभे राहून एक प्रश्न स्वतःला विचारला, या विजयाची किंमत इतकी भयानक का असावी? याच क्षणापासून त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा परिवर्तनाचा प्रवास सुरू झाला.

कलिंग युद्धानंतर अशोक यांनी हिंसेचा मार्ग सोडला आणि बुद्धिस्म स्वीकारले. त्यांनी धम्म हा जीवनाचा आणि राज्यकारभाराचा आधार बनवला. धम्म म्हणजे केवळ धार्मिक विचार नव्हता. तर तो होता दया, करुणा, अहिंसा, सहिष्णुता, सर्व धर्मांचा आदर. सम्राट अशोक यांनी युद्ध जिंकणाऱ्या राजापासून मानवतेचा संदेश देणाऱ्या राजामध्ये केलेले रूपांतर हे जगाच्या इतिहासात अद्वितीय मानले जाते. अशोक यांनी आपल्या राज्यात धम्मनीती राबवली. त्यांनी प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. रस्त्यांच्या कडेला झाडे लावणे, प्रवाशांसाठी धर्मशाळा उभारणे, विहिरी बांधणे, रुग्णालये उभारणे या सगळ्या गोष्टी त्या काळात अत्यंत प्रगत विचारांचे उदाहरण होते. त्यांनी प्राण्यांच्या हत्येवर मर्यादा आणल्या आणि पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता दाखवली. त्यांच्या शिलालेखांमध्ये प्रजेबद्दलची काळजी आणि नैतिकतेचा संदेश स्पष्टपणे दिसतो.




सम्राट अशोक यांनी बुद्धिसम चा संदेश केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही. तर त्यांनी धम्मदूत विविध देशांत पाठवले. श्रीलंका, म्यानमार, थायलंड, नेपाळ, अफगाणिस्तान अशा अनेक देशांमध्ये बौद्ध विचारांचा प्रसार झाला. इतिहासात सांगितले जाते की त्यांचा पुत्र महिंद्र आणि कन्या संघमित्ता यांनी श्रीलंकेत बौद्ध धर्माचा प्रसार केला. यामुळे भारताची सांस्कृतिक ओळख जगभर पोहोचली. अशोक यांनी आपल्या प्रशासनात नैतिकतेला विशेष महत्त्व दिले. त्यांनी धम्ममहामात्र नावाचे अधिकारी नेमले जे लोकांच्या कल्याणाची काळजी घेत होते. राज्यकारभाराचा उद्देश केवळ सत्ता टिकवणे नसून प्रजेचे सुख आणि कल्याण आहे, हा विचार त्यांनी प्रत्यक्षात आणला. आजच्या लोकशाही व्यवस्थेतही हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज भारताने विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थकारणात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक तणाव, हिंसा, असहिष्णुता आणि द्वेषाची भावना अनेक ठिकाणी दिसून येते. अशा वेळी सम्राट अशोक यांची धम्मनीती आपल्याला आठवण करून देते की, सत्ता मोठी असते, पण मानवता त्याहून मोठी असते. त्यांच्या जीवनातून आपल्याला एक महत्त्वाचा संदेश मिळतो. खरा विजय तलवारीने नाही, तर करुणेने मिळतो. आज भारताच्या राष्ट्रीय प्रतीकांमध्येही अशोक यांची छाप दिसते. भारतीय राष्ट्रचिन्हातील लॉयन कैपिटल ऑफ अशोका हे त्यांच्याच काळातील सारनाथ स्तंभाचे शिल्प आहे. तसेच भारतीय ध्वजावरील अशोक चक्र हे त्यांच्या धम्मचक्राचे प्रतीक आहे. याचा अर्थ असा की आधुनिक भारताच्या मूल्यांमध्येही सम्राट अशोक यांच्या विचारांची छाया आहे. आज जगभरात युद्धे, संघर्ष आणि राजकीय तणाव वाढताना दिसत आहेत. अशा काळात सम्राट अशोक यांचा इतिहास आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो. हिंसेने सत्ता मिळू शकते, पण मन जिंकता येत नाही. मानवतेचा मार्ग स्वीकारणारा राजा खऱ्या अर्थाने महान ठरतो.

सम्राट अशोका यांचे जीवन म्हणजे शक्तीपासून शांतीकडे, युद्धापासून करुणेकडे आणि अहंकारापासून मानवतेकडे जाणाऱ्या प्रवासाची प्रेरणादायी कथा आहे. त्यांनी दाखवलेला धम्माचा मार्ग आजही मानवतेसाठी प्रकाशाचा दीप आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ त्यांच्या साम्राज्याचे स्मरण करू नये, तर त्यांच्या विचारांचे स्मरण करावे. कारण खऱ्या अर्थाने महान राजा तोच असतो, जो तलवारीने नव्हे, तर मानवतेने जग जिंकतो. सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या महान विचारांना विनम्र अभिवादन!

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# रामेश्वर (रुई) येथे भक्तिमय उत्साहाच्या वातावरणात. प्रभू श्रीराम जन्मसोहळा आणि 'श्रीराम' रथ उत्सव







लातूर – भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, त्याग आणि समर्पणाचे मूर्तीमंत प्रतीक, समस्त भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेले भारतीय संस्कृती दर्शन 'श्रीराम' रथ यात्रा सोहळा रामनवमी गुरुवार रोजी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तिमय वातावरणात लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रुई) येथे पार पडला. या सोहळ्यास रामेश्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते.

प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी सकाळी पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का दादाराव कराड यांनी श्रीराम मंदिरास अर्पण केलेल्या सुंदर, रेखीव व वैशिष्ट्यपूर्ण अशा भारतीय संस्कृती दर्शन– श्रीराम रथाची, रामेश्वर गावत ग्रामप्रदक्षिणा झाली. या रथयात्रेत वाजंत्रीसह विविध भजनी मंडळी, टाळकरी, असंख्य भव्य ध्वज हातात घेऊन प्रभू रामचंद्राचा जयघोष करीत भाविक भक्त सहभागी झाले होते. मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीवातावरणात निघालेल्या या रथयात्रेत महिला पुरुष सर्व स्तरातील नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

या रथ यात्रेचा समारोप प्रभू श्रीराम मंदिरात झाला यात्रसंगी ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचे कीर्तन झाले. कीर्तनातून बोलताना हरिहर महाराज यांनी प्रभू श्रीराम हे विष्णूचा सातवा अवतार होते. प्रभू रामाचे ईश्वर म्हणजेच रामेश्वर असल्याचे सांगून त्रितायुगात दुष्टशक्तीचा नाश करण्यासाठी आणि धर्मरक्षण



करण्यासाठी मानवाला सन्मार्गावर आणण्यासाठी जन्म झाला. प्रभू श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम असून त्यांचे जीवन सत्य, त्याग, कर्तव्य, एक वचनी, एक पत्नी असा नैतिक मूल्यांचा आदर्श आहे असे त्यांनी बोलून दाखवले.

ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. श्रीराम रथ यात्रा सोहळ्यास रामेश्वर येथील ज्येष्ठ मार्गदर्शक तुळशीरामअण्णा कराड, प्रतिष्ठित शेतकरी काशीरामनाना कराड, माइर्स पुणे एमआयटीचे मंगेशबापू कराड, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड, एमआयटीचे डॉ. हनुमंत कराड, बालासाहेब कराड, संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, महेंद्र जाधवर, डॉ. सौरभ कराड, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, तेजस कराड, पृथ्वीराज कराड, राजवीर कराड यांच्यासह संपूर्ण कराड परिवाराची प्रमुख उपस्थिती होती. रामेश्वर आणि परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त टाकळगाव येथे २९ मार्चला भव्य मोफत आरोग्य शिबिर

लातूर (प्रतिनिधी):राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर तालुक्यातील टाकळगाव येथे रविवार, २९ मार्च रोजी भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटर, धन्वंतरी हॉस्पिटल, जाधव हॉस्पिटल, आशा आरोग्यधाम आणि तांदुळजा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य शिबीर टाकळगाव येथे रविवार, २९ मार्च रोजी सकाळी १० ते २ वाजता पर्यंत होणार आहे.

तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग

या आरोग्य शिबिरात नामवंत डॉक्टरांचा चमू रुग्णांची तपासणी करणार आहे. यामध्ये प्रामुख्याने: गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटरचे डॉ. रमेश भराटे, धन्वंतरी हॉस्पिटल डॉ. मनोज भडके, डॉ. पल्लवी भडके, जाधव हॉस्पिटल डॉ. सौरभ जाधव, डॉ. मेघा जाधव, स्वामी रामानंद तिर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाइचे डॉ. महेश कदम, डॉ. शंकरराव धपाटे, आशा आरोग्यधाम डॉ. व्ही. व्ही.घवले, प्राथमिक आरोग्य केंद्र तांदुळजा येथील डॉ. व्यवहारे, डॉ. स्वाती डोलारे यांसह अन्य तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश आहे.

टाकळगावसह तांदुळजा, सारसा, भोसा, निळकंठ, वांजरखेडा आणि परिसरातील इतर गावांमधील नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिराचे आयोजन टाकळगावचे उपसरपंच निवृत्ती देवणे, शिवतेज प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष मनोज पवार, युवक काँग्रेस अध्यक्ष अमोल कदम, व्हा. चेअरमन धनंजय शिंदे, नितीन भिसे, संजय शिंदे आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे. वाढदिवसानिमित्त राबवण्यात येत असलेल्या या विधायक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अंकुर स्वयंसेवी संस्था आयोजित शासकीय कार्यालय भेट उपक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी–अंकुर स्वयंसेवी संस्था,केज आयोजित शासकीय कार्यालय भेट हा उपक्रम संपन्न झाला आहे.अंकुर संस्था ही गेल्या पंधरा वर्षापासून केज तालुक्यात महिला सक्षमीकरण, एकल महिला संघटन, महिलांच्या प्रश्नावर सातत्यपूर्ण काम करत आहे.



याचाच भाग म्हणून जागतिक महिला दिनानिमित्त मार्च महिन्यामध्ये गाव पातळीवर महिलांचे मेळावे घेतले जातात. येवता,कानडी माळी येथे मेळावे घेण्यात आले. दि. २५ मार्च २०२६ रोजी महिलांनी अधिकारी,कर्मचारी यांच्याशी संवाद साधून प्रशासन काय ते समजून घ्यावे, कार्यालया प्रति असलेली भीती कमी होऊन महिलांचे धाडस निर्माण व्हावे, महिलांचे विविध प्रश्न प्रशासन स्तरावर मार्गी लागावेत महिलांच्या अनेक प्रकारच्या अडी-अडचणी सोडवण्यासाठी महिला सक्षमपणे स्वतःच्या पायावर उभा रहाव्यात, महिलांना प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संवाद साधता यावा, यामध्ये पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय, माननीय न्यायालय व न्यायालया विषयी जागृती निर्माण व्हावी. पोलीस स्टेशन आणि कोर्टाची पायरी चढू नये ही सर्वसामान्य नागरिकांची म्हण आहे. याला छेद देत कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संवादातून प्रश्न सुटतात आणि मदतही करतात असे लक्षात आले असता. संस्था केज तालुक्यात काम करते या कामाची ही ओळख झाली. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची भेट घेऊन विविध विषयावर सविस्तरपणे चर्चा करून महिलांना मनमोकळेपणाने संवाद साधता आला. यासाठी कृतिशील आणिअत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे. माणूस म्हणून जगताना आम्ही स्वतःला भारताचे नागरिक मानतो आपल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्याची जाणीव व्हावी याविषयी चर्चा केली.

शासकीय कार्यालयाला भेटी हा उपक्रम अंकुर मार्फत राबवला जातो दि. २५ मार्च २०२६ रोजी केज तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयास भेटी या उपक्रमांतर्गत सर्वप्रथम छत्रपती शिवाजी चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महिला तक्रार निवारण केंद येथील समुपदेशक जनाबाई खाडे मॅडम,कुलकर्णी सर यांच्याशी संवाद साधला, पोलीस स्टेशन केज येथील पोलीस निरिक्षक स्वप्निल सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले, पंचायत समिती केज येथील उमेद अभियानाच्या नंदा ओव्हाळ मॅडम यांच्याशी संवाद केला.

जिल्हा सत्र न्यायालयाचे मा. न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे मा. न्यायाधीश मॅडम यांच्याशी संवाद झाला.अत्यंत आदराने आमचा सन्मान केला सविस्तर असे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. ड.अनिता मुंडे यांचे सहकार्य लाभले.

केज नगरपंचायतच्या नगराध्याक्षा सौ. सितातार्ई बनसोड यांच्याशी शहरातील एकल महिलांचा सर्वे व्हावा याविषयी संवाद केला.निवेदन दिले.

यावेळी केज तालुक्यातील लीडर महिला सुरेखाताई, कोमलताई,वैजंताताई, वच्छालाताई, शांताताई, सूर्यवंशीताई अंकुरचे फेलो रत्नमाला गायकवाड,तसलीम इनामदार,अंकुरच्या अध्यक्षा अनिता कांबळे, सचिव लक्ष्मण हजारे सहभागी होते.

# व्यापाऱ्याला लुटणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी केले गजाआड

केज/प्रतिनिधी □केज शहरातील एका व्यापाऱ्याला लुटणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी गजाआड केले आहे. सदर प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने धाडसी कार्यवाही केल्यामुळे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील चोरी, घरफोडी, जबरी चोरी व दरोडा इत्यादी मालमत्तेचे विरुद्ध गुन्हे उघड करण्याचे आदेश हे स्थानिक गुन्हे शाखेला दिलेले आहेत.

दिनांक २३ मार्च २०२६ रोजी फिर्यादी बाळासाहेब सोपानराव घुले रा.समता नगर केज हे सायंकाळी ६-१५ वाजण्याच्या सुमारास केज शहरातून पायी त्यांच्या दुकानाकडे जात असताना प्रशांत बियर बार च्या समोर मोबाईल फोनवर बोलत जात असताना दोन अज्ञात इसमांनी व्यापारी बाळासाहेब घुले यांच्या पाठीमागून गाडीवर येऊन घुले यांचा मोबाईल फोन व रोख रक्कम दोन हजार रुपये जबरदस्तीने चोरी करून घेऊन गेले होते. इत्यादी वर्णनावरून फिर्यादी बाळासाहेब घुले यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१४९/२०२६ कलम ३०९(४),३(५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याबाबत पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड, यांनी आदेशित केले होते त्यावरून पोलीस उपनिरीक्षक विघ्ने हे त्यांच्या बदकासह सदर आरोपीचा शोध घेण्याकामी दिनांक २५ मार्च २०२६ रोजी केज पोलीस ठाणे हद्दीत रवना झाले होते. आरोपीचा शोध घेत असताना सदर पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी




आवेज खाजा शेख रा.कोकीसपीर केज व सोहेल मोहम्मद शेख रा. अजीजपुरा केज यांनी केला असून यातील आरोपी आवेज शेख हा धारूर रोड लगत असलेल्या श्रेया बियर बार जवळ उभा आहे. यावरून सदर ठिकाणी जाऊन शिताफिने आवेज शेख यास ताब्यात घेतले असता सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिक विचारपूस केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार सह केला असल्याचे कबूल केले. आरोपी त्यांनी सदर गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल तिची अंदाजे किंमत १ लाख २० हजार रुपये किमतीची मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील चोरलेला मुद्देमाल आरोपी सोहेल शेख यांच्या ताब्यात असून आवेज शेख यास ताब्यात घेतल्याची माहिती मिळाल्यापासून तो फरार आहे. सदर आरोपीचा शोध सुरू आहे आरोपी आवेज शेख यास पुढील कार्यवाही कामे पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपी नामे आवेज खाजा शेख याच्या विरुद्ध यापूर्वी जबरी चोरी, खुन, खुनाचा प्रयत्न, चोरी यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार महेश जोगदंड, पोलीस हवालदार दिलीप गीते, चालक पोलीस हवालदार गणेश मराडे यांनी केली आहे.

# लातुरात दोन दिवसीय ' मानसरंग' नाट्य महोत्सवाचे आयोजन

लातूर : लातुरात दि. २८ व २९ मार्च २०२६ रोजी मानसिक आरोग्याच्या विविध पैलूंवर भाष्य करणाऱ्या ' मानसरंग ' नाट्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च सेंटरचे संचालक - लातूरचे ख्यातनाम मानसोपचार तज्ञ डॉ. मिलिंद पोतदार यांनी दिली. या नाट्यमहोत्सवात दोन दिवसांमध्ये एकूण चार नाटके सादर होणार आहेत.

शनिवार, दि. २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता संत तुकाराम महाराज यांचा सामान्य माणूस ते भक्त , भक्त ते देव व देवत्वापर्यंतचा प्रवास प्रेक्षकांसमोर मांडणारे ' आनंदओवरी' हे नाटक होणार आहे. यामध्ये डॉ.मिलिंद पोतदार यांची भूमिका पाहायला मिळणार आहे. प्रख्यात लेखक दि. बा. मोकाशी यांनी लिहिलेल्या कथानकाची नाट्य आवृत्ती अतुल पेठे यांनी केली आहे. या नाटकाचे दिग्दर्शन श्रुतिकांत ठाकूर यांनी केले आहे. दुपारी अडीच वाजता लेखक च.प्र. देशपांडे यांनी लिहिलेले व अभिजित झुंजारराव यांनी दिग्दर्शित केलेले 'मन' हे नाटक सादर होईल. यंत्रमेश वाणी यांनी भूमिका साकारली आहे. रविवार, दि. २९ मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता ' मग तू मला खा'हे नाटक सादर होणार आहे. लेखन व दिग्दर्शन विभावरी देशपांडे यांनी केले आहे. या नाटकात अनन्या रत्नपारखे, दीप मेहंदळे, गौतमी अहेर , वेदांत रानडे, हर्षद राजपाठक, ऋचा आपटे यांचा अभिनय पाहायला मिळणार आहे. तर रविवारी दुपारी अडीच वाजता 'तो राजहंस एक ' हे नाटक होणार आहे. या नाटकाचे लेखक दत्ता पाटील हे असून दिग्दर्शन सचिन शिंदे यांनी केले आहे. या नाटकामध्ये प्राजक्त देशमुख, अमेय बर्वे, धनंजय गोसावी, हेमंत महाजन व अनिता दाते हे कलाकार आपले कलाविष्कार सादर करणार आहेत.

प्रत्येक नाटकांच्या सादरीकरणानंतर त्यातील कलाकार, लेखक , दिग्दर्शक व मानसोपचार तज्ञ यांचे चर्चासत्रही होणार आहे. त्यामध्ये मानसिक आरोग्याचे विविध पैलू उलगडले जाणार आहेत. हा नाट्यमहोत्सव विनामूल्य असला तरी त्यासाठी आगाऊ नोंदणी करणे व प्रवेश पत्रिका असणे बंधनकारक असल्याचे डॉ. मिलिंद पोतदार यांनी सांगितले. या नाट्य महोत्सवाचे आयोजक सोसायटी फॉर वेलबिइंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन ( स्वर ), अंतरंग व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र आणि सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च सेंटर हे आहेत.

# संविधानिक मूल्ये अंगीकारल्याशिवाय जबाबदार नागरिक घडत नाहीत डॉ. अशोक नारनवरे

लातूर (प्रतिनिधी) : भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' अंतर्गत संविधानिक मूल्य आणि जबाबदार नागरिक या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान पार पडले.




या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. अशोक नारनवरे (मराठी विभाग, मास्टर दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजानी) यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, भारतीय संविधानाने प्रत्येक सामान्य नागरिकाला केवळ अधिकारच दिले नाहीत, तर त्यासोबत जबाबदाऱ्यांची जाणीवही दिली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, समानता आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्ये समाजव्यवस्थेचा पाया आहेत. 'स्व' ऐवजी 'आपण' ही भावना अंगीकारल्याशिवाय राष्ट्राची एकता आणि व्यक्तीची प्रतिष्ठा टिकू शकत नाही.

ते पुढे म्हणाले, संविधानिक मूल्यांचे पालन केल्यास समाजात सौहार्द, न्याय आणि समतेचे वातावरण निर्माण होते. युवकांनी संविधानाचा सखोल अभ्यास करून त्यातील मूल्ये आपल्या आचार-विचारात उतरवली पाहिजेत. तेव्हाच खऱ्या अर्थाने जबाबदार नागरिक घडू शकतील.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना डॉ. हरिश्चंद्र चौधरी (राज्यशास्त्र विभाग प्रमुख, जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर) म्हणाले की, विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये केवळ अभ्यासापुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे. संविधानाचे ज्ञान हे केवळ परीक्षेसाठी नसून ते भविष्य घडविण्याचे प्रभावी साधन आहे.ते पुढे म्हणाले, संविधानाची जाणीव असलेला युवकच समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संविधानाच्या तत्वांचा आदर राखत जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका पार पाडावी. या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांविषयी जागरूकता निर्माण होऊन जबाबदार नागरिकत्वाची जाणीव अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# प्रा तानाजी भोसले यांचा सत्कार

लातूर: स्विफ्टन लिफ्ट एज्युकेशन मीडिया पुणे चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत बचत गटाचे अध्यक्ष,महाराष्ट्र राज्यशास्त्र कनिष्ठ महाविद्यालय परिषदेचे लातूर विभागीय सचिव प्रा तानाजी भोसले यांचा लातूर येथे सत्कार करण्यात आला.




प्रा. तानाजी भोसले हे संत कबीर प्रतिष्ठानचे नियमक मंडळ सदस्यही आहेत. प्रा. तानाजी भोसले यांनी गावभागातील मागास विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. राष्ट्र भाषा हिंदीचा प्रसार प्रचार आदि कार्यात सहभाग नोंदवला याबद्दल पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत बचत गटाचे उपाध्यक्ष पांडुरंग देडे, मार्गदर्शक प्राचार्य आर. डी.निटू रकर, सल्लागार व्यकट बिराजदार आदींनी त्यांचा सत्कार केला व भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.